मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

# रयत समाचार

epaper.rayatsamachar.com

खिंचो न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४८५ वा ● शुक्रवार, ता. ०२ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



## ऐतिहासिक विजयस्तंभास अजित पवार यांचे अभिवादन

**पुणे । रयत समाचार**

२०८ व्या शौर्यदिनानिमित्त राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज सकाळी पेरणे फाटा येथील ऐतिहासिक विजयस्तंभास अभिवादन केले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी)चे महासंचालक सुनील वारे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, दरवर्षीप्रमाणे राज्य शासनाच्या वतीने विजयस्तंभास अभिवादन करण्यात येत असून, हे अभिवादन राज्यातील सर्व नागरिकांच्या वतीने आहे. विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या आयोजनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या असल्याची माहिती त्यांनी दिली. जिल्हा प्रशासनाने केलेल्या उत्तम नियोजनाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समाधान व्यक्त केले. अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांची मोठी संख्या लक्षात घेऊन राज्य शासनाच्या वतीने आवश्यक ती सर्व काळजी घेण्यात आली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## विमान इंधनदरात ७ टक्क्यांची कपात व्यावसायिक एलपीजी सिलिंडर महाग

**नवी दिल्ली । रयत समाचार**

विमान इंधन (एव्हिएशन टर्बाइन फ्युएल- ATF) दरात १ जानेवारी २०२६ पासून तब्बल ७.३ टक्क्यांची कपात करण्यात आली असून, त्याचवेळी १९ किलो वजनाच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरात ₹१११ ची वाढ करण्यात आली आहे. सरकारी तेल विपणन कंपन्यांनी (IOC, BPCL, HPCL) जागतिक बाजारातील दर व चलन विनिमय दर लक्षात घेऊन मासिक दर पुनरावलोकन जाहीर केले आहे. दिल्लीमध्ये ATF दर प्रति किलोलीटर ₹७,३५३.७५ ने कमी होऊन ₹९२,३२३.०२ इतका झाला आहे. मागील तीन महिन्यांत झालेल्या दरवाढीनंतर ही मोठी कपात मानली जात असून, ऑक्टोबरपासून झालेल्या वाढीपैकी सुमारे दोन-तृतीयांश वाढ या कपातीमुळे समायोजित झाली आहे. मुंबईत दर ₹८६,३५२.१९ प्रति किलोलीटर इतका करण्यात आला आहे. तर चेन्नईमध्ये हा दर ₹९५,७७० आणि कोलकात्यात ₹९५,३७८.०२ प्रति किलोलीटर निश्चित करण्यात आला आहे. स्थानिक कररचनेनुसार विविध शहरांमध्ये दर वेगवेगळे असतात. ही कपात विमान कंपन्यांसाठी दिलासादायक ठरणार आहे, कारण त्यांच्या एकूण ऑपरेटिंग खर्चापैकी सुमारे ४० टक्के खर्च इंधनावर होतो. मात्र, या दरकपातीचा तिकीट दरांवर तात्काळ परिणाम होईल का, याबाबत विमान कंपन्यांकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.दरम्यान, हॉटेल, रेस्टॉरंट व व्यावसायिक आस्थापनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या १९ किलो एलपीजी सिलिंडरच्या दरात ₹१११ ची वाढ करण्यात आली असून, दिल्लीमध्ये हा दर आता ₹१,६९१.५० झाला आहे. याआधी डिसेंबरमध्ये ₹१५.५० आणि त्यापूर्वी ₹५ रुपयांची कपात करण्यात आली होती. सध्याची वाढ ही जूननंतरची सर्वाधिक पातळी असल्याचे सांगण्यात येते. घरगुती वापरासाठी असलेल्या १४.२ किलो एलपीजी सिलिंडरच्या दरात मात्र कोणताही बदल करण्यात आलेला नाही. एप्रिल २०२५ मध्ये करण्यात आलेल्या ₹५० वाढीनंतर हा दर सध्या ₹८५३ इतकाच कायम आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती काही प्रमाणात स्थिर असल्या तरी हिवाळ्यातील वाढलेली उष्णता गरज (heating demand) यामुळे जागतिक बाजारात एलपीजी दर वाढल्याचे सांगण्यात येत आहे. पेट्रोल व डिझेलचे दर मात्र मार्च २०२५ मधील ₹२ प्रति लिटर कपातीनंतर स्थिर ठेवण्यात आले असून, सध्या दिल्लीमध्ये पेट्रोल ₹९४.७२ आणि डिझेल ₹८७.६२ प्रति लिटर दराने विकले जात आहे.

### ग्रामसभाच ठरवणार गावचा विकास

## ‘व्ही. बी. जी-राम जी’ योजनेतून रोजगाराची हमी - केंद्रीय मंत्री चौहान

**शिर्डी । रयत समाचार**

गावाच्या विकासाचे निर्णय आता दिल्ली किंवा मुंबईत नव्हे, तर थेट ग्रामसभेतच घेतले जाणार असून ग्रामस्थांच्या सहभागातूनच विकासाची दिशा ठरणार आहे, असे प्रतिपादन केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याण व ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केले. ‘विकसित भारत जी-राम जी’ या नव्या योजनेअंतर्गत ग्रामीण कुटुंबांना १०० ऐवजी १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. राहाता तालुक्यातील लोणी बुद्रुक येथे आयोजित विशेष ग्रामसभेत ते बोलत होते. या कार्यक्रमास जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, केंद्रीय ग्रामविकास विभागाच्या सहसचिव रोहिणी भाजीभाकरे, योजनेचे राज्य सचिव गणेश पाटील, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, तसेच लोणी ग्रामपंचायतीच्या सरपंच कल्पना मैड आदी उपस्थित होते. चौहान म्हणाले की, नव्या योजनेत रोजगार हमीच्या कामांमध्ये लवचिकता देण्यात आली असून शेतकऱ्यांच्या पेरणी व कापणीच्या काळात (सुमारे ६० दिवस) ही कामे थांबवली जातील, जेणेकरून शेतीकामासाठी मजुरांची कमतरता भासणार नाही. त्यामुळे शेती आणि रोजगार हमी यांचा समतोल साधला जाणार आहे. योजनेच्या आर्थिक तरतुदींबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, यापूर्वी मनरेगासाठी ८८ हजार कोटी रुपये खर्च होत होते, तर यंदा तब्बल १ लाख ५१ हजार २८२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पुढील पाच वर्षांत सुमारे ८ लाख कोटी रुपयांचा निधी खर्च होण्याची



> **काम पूर्ण झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत मजुरी थेट कामगारांच्या बँक खात्यात जमा केली जाईल. जर विलंब झाला तर ०.०५ टक्के दराने व्याजासह रक्कम देणे कायद्याने बंधनकारक राहील. तसेच मागणी करूनही काम न मिळाल्यास बेरोजगारी भत्ता देण्याची तरतूदही करण्यात आली आहे.**
>
> **-शिवराज सिंह चौहान,**
> केंद्रीय कृषीमंत्री

अपेक्षा असून, योग्य नियोजन झाल्यास प्रत्येक ग्रामपंचायतीला सुमारे ३ कोटी रुपयांपर्यंत विकासनिधी उपलब्ध होऊ शकतो. ग्राम रोजगार सेवक व तांत्रिक कर्मचाऱ्यांबाबत बोलताना चौहान म्हणाले की, कोणाचेही काम जाणार नाही. उलट प्रशासकीय खर्चाची मर्यादा ६ टक्क्यांवरून ९ टक्के करण्यात आली असून, हा निधी कर्मचाऱ्यांचे मानधन व वेतनासाठी वापरला जाणार आहे. सॉफ्टवेअर प्रणालीद्वारे वेतन वेळेवर मिळण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या योजनेत केवळ खड्डे खोदण्यापुरते काम न करता गावासाठी उपयुक्त व टिकाऊ विकासकामे केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जलसंधारण, पक्के रस्ते, स्वयंसहाय्यता गटांसाठी पायाभूत सुविधा निर्माण करून कायमस्वरूपी मालमत्ता उभारण्यावर भर दिला जाईल. महिलांसाठी ३३ टक्के रोजगार राखीव ठेवण्यात आला असून, त्या ‘मेट’ (पर्यवेक्षक) म्हणूनही काम करू शकतील. महिलांना केवळ ‘लाडकी बहीण’ योजनेपुरते मर्यादित न ठेवता ‘लखपती दीदी’ बनवण्याचा केंद्र सरकारचा संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले. शासकीय निधीचा अपव्यय टाळण्यासाठी ‘पीएम गतीशक्ती’, ‘जिओ-टॅगिंग’ आणि ‘डिजिटल प्रकटीकरण’ अनिवार्य करण्यात आले असून, यामुळे कामांची पारदर्शकता वाढेल. वर्षातून दोनदा सामाजिक लेखापरीक्षण आणि सरपंचांकडून दर आठवड्याला कामांचा अहवाल जाहीर करणे बंधनकारक असल्याचेही त्यांनी नमूद केले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील या महत्त्वाकांक्षी योजनेच्या जनजागृतीचा पहिला कार्यक्रम लोणी बुद्रुक येथे होणे ही अभिमानाची बाब आहे. देशभरातील लाखो ग्रामपंचायती व बचत गटांपर्यंत या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले असल्याने ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ‘झाडे लावा, झाडे जगवा’ या संदेशासह मान्यवरांच्या हस्ते विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थांचा सन्मान करण्यात आला.



## भारतीय वायुसेनेच्या उपप्रमुखपदी नागेश कपूर यांची नियुक्ती

**नवी दिल्ली । रयत समाचार**

एअर मार्शल नागेश कपूर यांनी ता. १ जानेवारी २०२६ रोजी भारतीय वायुसेनेच्या उपप्रमुखपदाचा (Vice Chief of the Air Staff) पदभार अधिकृतपणे स्वीकारला. ते एअर मार्शल नरमदेश्वर तिवारी यांच्या जागी नियुक्त झाले असून, तिवारी यांनी देशसेवेत ४० वर्षांची गौरवशाली कारकीर्द पूर्ण केल्यानंतर निवृत्ती घेतली आहे. एअर मार्शल नागेश कपूर यांना परम विशिष्ट सेवा पदक, सर्वोत्तम युद्ध सेवा पदक, अति विशिष्ट सेवा पदक आणि विशिष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी डिसेंबर १९८५ मध्ये राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी येथून पदवी प्राप्त केली असून ६ डिसेंबर १९८६ रोजी भारतीय वायुसेनेच्या लढाऊ शाखेत प्रवेश केला. अनुभवी युद्धक वैमानिक, कुशल फ्लाइंग इन्स्ट्रक्टर आणि लढाऊ विमान तुकडीचे नेतृत्व करणारे अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी मिग-२१ आणि मिग-२९ या लढाऊ विमानांचे सर्व प्रकार उडवले असून विविध विमानांवर ३,४०० तासांहून अधिक उड्डाणाचा अनुभव आहे. संरक्षण सेवा स्टाफ कॉलेज आणि राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयातून प्रशिक्षण घेतलेल्या एअर मार्शल कपूर यांनी ३९ वर्षांहून अधिक काळाच्या सेवेत कमांड, ऑपरेशन्स, प्रशिक्षण आणि स्टाफ पदांवर महत्त्वाची जबाबदारी पार पाडली आहे. मध्य वायू कमांडमध्ये लढाऊ स्कॉड्रनचे कमांडिंग ऑफिसर, पश्चिम वायू कमांडमध्ये फ्लाइंग बेसचे स्टेशन कमांडर तसेच प्रमुख हवाई तळाचे एअर ऑफिसर कमांडिंग म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. प्रशिक्षण क्षेत्रात त्यांनी वायुसेना अकादमीत मुख्य प्रशिक्षक (फ्लाइंग) म्हणून काम केले असून वेलिंग्टन येथील प्रतिष्ठित डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेजमध्ये डायरेक्टिंग स्टाफ म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. वायुसेना अकादमीत कार्यरत असताना पीसी-७ एमके-२ विमानांच्या समावेशात आणि त्यांच्या कार्यान्वयनात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. एअर मार्शल कपूर यांनी पाकिस्तानमध्ये भारताचे संरक्षण अटॅशे म्हणून राजनैतिक जबाबदारीही यशस्वीपणे पार पाडली आहे. तसेच वायु मुख्यालयात सहायक वायुसेना प्रमुख (ऑपरेशन्स धोरण), दक्षिण-पश्चिम वायू कमांडमध्ये वायु संरक्षण कमांडर, मध्य वायू कमांड मुख्यालयात वरिष्ठ वायुसेना अधिकारी आणि वायु मुख्यालयात कार्मिक प्रभारी वायु अधिकारी अशी महत्त्वाची पदे भूषवली आहेत. उपप्रमुखपदाची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी त्यांनी प्रशिक्षण कमांडचे एअर ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ तसेच दक्षिण-पश्चिम वायुसेना कमांडचे कमांडर-इन-चीफ म्हणून कार्य केले. राष्ट्रासाठी दिलेल्या उल्लेखनीय सेवेबद्दल त्यांना २००८ मध्ये वायुसेना पदक, २०२२ मध्ये अति विशिष्ट सेवा पदक आणि २०२५ मध्ये राष्ट्रपतींकडून परम विशिष्ट सेवा पदक व सर्वोत्तम युद्ध सेवा पदक प्रदान करण्यात आले आहे. एअर मार्शल नागेश कपूर यांच्या नियुक्तीमुळे भारतीय वायुसेनेच्या नेतृत्वाला अनुभवी व सक्षम दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## देशातलं ‘व्हीआयपी कल्चर’ थांबवण्यासाठी ‘शासन निर्णय’ कधी निघणार?

देशातलं ‘व्हीआयपी कल्चर’ थांबवण्यासाठी ‘शासन निर्णय’ कधी निघणार, हा प्रश्न आज केवळ चर्चेपुरता उरलेला नाही; तो लोकशाहीच्या आत्म्याला छेद देणारा ज्वलंत मुद्दा बनला आहे. समानतेवर उभ्या असलेल्या व्यवस्थेत प्रत्यक्ष जीवनात मात्र असमानतेची खोल दरी दिसते. रस्ते, विमानतळ, रेल्वे स्थानके, सरकारी कार्यालये किंवा सार्वजनिक कार्यक्रमसर्वत्र एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते: सामान्य नागरिक दुय्यम ठरतो आणि व्हीआयपी केंद्रस्थानी येतो. ही स्थिती केवळ गैरसोयीची नसून लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर थेट आघात करणारी आहे. लोकशाहीत सत्ता सेवा देण्यासाठी असते; पण व्हीआयपी कल्चरमध्ये ती सवलतींचं साधन बनते. नेत्यांच्या दौऱ्यांमुळे नागरिकांचा वेळ, श्रम आणि स्वाभिमान गमावला जातो. नियम सर्वांसाठी समान नसल्याची भावना समाजमनात खोलवर रुजते. प्रशासन, सुरक्षा आणि यंत्रणा काही मोजक्या लोकांसाठी झुकवली जाते, तर त्याचा भार बहुसंख्य नागरिकांना सहन करावा लागतो. हा प्रश्न चिन्हांचा नाही; तो मानसिकतेचा आहे. ठोस आणि निर्भय शासन निर्णयांशिवाय या असंस्कृतीचं उच्चाटन शक्य नाही. ‘व्हीआयपी’ म्हणजे ‘व्हेरी इम्पॉर्टंट पर्सन’पण लोकशाहीत खरोखर महत्त्वाचा कोण? मतदान करणारा नागरिक, कर भरणारा कामगार, रांगेत उभा असलेला रुग्ण, शिक्षणासाठी झगडणारा विद्यार्थी आणि शेतात राबणारा शेतकरीहेच



लोक व्यवस्थेचा कणा आहेत. संविधानाच्या कलम १४ नुसार प्रत्येक नागरिक कायद्यापुढे समान आहे; मात्र प्रत्यक्ष व्यवहारात पद, सत्ता आणि जवळीक यांवर महत्त्व ठरतं. ही विसंगती सामाजिक न्यायाच्या संकल्पनेलाच कमकुवत करते. व्हीआयपी कल्चरचं सर्वाधिक विदारक रूप रस्त्यांवर दिसतं. नेत्यांच्या दौऱ्यांसाठी तासन्‌तास वाहतूक ठप्प केली जाते.

कार्यालयात जाणारे कर्मचारी, शाळेत जाणारी मुलं, बाजारात निघालेले वृद्धसगळे अडकतात. रुग्णवाहिका किंवा अग्निशमन वाहन अडकलं, तर तो निव्वळ गैरव्यवस्थापनाचा नव्हे, तर माणुसकीचा अपयशाचा क्षण ठरतो. काहींच्या सुरक्षिततेसाठी अनेकांचे जीवन विस्कळीत होणं हे लोकशाहीला शोभणारं नाही. सुरक्षा आवश्यक आहे, हा युक्तिवाद मान्यच आहे. लोकप्रतिनिधींचं संरक्षण महत्त्वाचं आहे; पण प्रत्यक्ष धोका नसताना अवाजवी ताफ`, संपूर्ण रस्तेबंदी आणि यंत्रणेचं लकवा येणं ही सुरक्षा नसून सत्तेचं प्रदर्शन ठरतं. नागरिकांच्या जीवावर बेतणारी सुरक्षा व्यवस्था विवेकाच्या कसोटीवर टिकत नाही. आपत्कालीन सेवांची कार्यक्षमता कमी होणं हा त्याचा गंभीर परिणाम आहे. ही संस्कृती केवळ व्यवस्थेपुरती मर्यादित नाही; ती मानसिकतेत खोलवर रुजलेली आहे. ‘‘तो मोठा आहे’’, ‘‘तो साहेब आहे’’अशी गृहितकं आपण नकळत स्वीकारतो. प्रशासनात ‘यस सर’ संस्कृती बळावते. नियम सामान्यांसाठी कठोर, तर सत्ताधाऱ्यांसाठी लवचिक राहतात. याचा परिणाम तरुण पिढीवर होतोसत्ता म्हणजे सेवा नव्हे, तर विशेषाधिकार आहेत, असा चुकीचा संदेश समाजात पसरतो. अवाजवी बंदोबस्तासाठी हजारो पोलीस कर्मचारी, शेकडो वाहने, इंधन आणि अमूल्य मनुष्यबळ खर्ची पडते. गुन्हेगारी, महिला सुरक्षा आणि सार्वजनिक सुरक्षेकडे लक्ष देणं अपेक्षित असताना ही शक्ती व्हीआयपी मार्गावर उभी राहते. परिणामी सामान्य नागरिकांची सुरक्षा दुर्लक्षित होते आणि व्यवस्थेवर आर्थिक व मानवी ताण वाढतो. ग्रामीण भाग आणि लहान शहरंही या संस्कृतीपासून सुटलेली नाहीत. दौऱ्यांच्या निमित्ताने रस्ते बंद होतात, शाळा व कार्यालयांचे वेळापत्रक विस्कळीत होतं. विकासाच्या भाषणांच्या आड नागरिक अडतो, हा विरोधाभास अधिकच बोचरा ठरतो. स्थानिक पातळीवर स्पष्ट नियम आणि कठोर अंमलबजावणीचा अभाव ही समस्या तीव्र करतो. जगातील अनेक लोकशाही देशांत पद म्हणजे सेवा असते. मंत्री आणि पंतप्रधान सार्वजनिक वाहतूक वापरतात, नागरिकांमध्ये मिसळतात. भारतात २०१७ मध्ये लाल दिवे हटवण्याचा निर्णय झालातो प्रतीकात्मकदृष्ट्या महत्त्वाचा होता; पण तो अर्धवट ठरला. चिन्हे बदलली, मानसिकता नाही. ताफे, रस्तेबंदी आणि विशेष वागणूक कायम राहिली. व्हीआयपी कल्चरचा सर्वात मोठा आघात नागरिकांच्या विश्वासावर होतो. ‘‘कायदा सगळ्यांसाठी समान नाही’’ ही भावना लोकशाहीसाठी घातक आहे. माध्यमांनी



**गुरुदत्त वाकदेकर**
९९८७७४६७७६,मुंबई

झगमगाटाचं उदात्तीकरण न करता प्रश्न विचारले पाहिजेत. नागरिकांनीही ‘‘हे असंच चालतं’’ ही मौनसंमती झटकून टाकली पाहिजे. अनावश्यक सुरक्षा कमी करणे, वाहतूक बंदीवर स्पष्ट मर्यादा घालणे आणि सार्वजनिक ठिकाणी नियम सर्वांसाठी समानरीत्या लागू करणेहे कागदावर नव्हे, तर प्रत्यक्षात उतरायला हवे. लोकशाहीत अखेर एकच खरा व्हीआयपी आहेतो म्हणजे सामान्य नागरिक. हे सत्य शासनाने मान्य करून तात्काळ, ठोस आणि धाडसी निर्णय घेतले, तरच लोकशाहीचा श्वास मोकळा होईल. अन्यथा प्रश्न तसाच राहीलदेशातलं व्हीआयपी कल्चर थांबवण्यासाठी शासन निर्णय कधी निघणार?



## केंद्रीय कृषिमंत्री चौहान यांचे शनीदर्शन

**नेवासा । विजय खंडागळे**

देशाचे केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल कुटुंबासह श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर येथे शनीदेवाचे दर्शन घेतले. सकाळी साडेपाच वाजता त्यांनी शनी चौथऱ्यावर जाऊन शनीतेल अभिषेक करत मनोभावे दर्शन घेतले. देवस्थानच्या प्रशासकीय कार्यालयात नेवासा तालुक्याच्या वतीने आ. विठ्ठल लंघे, संगमनेर तालुक्याच्या वतीने आ. अमोल खताळ तसेच देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांनी केंद्रीय मंत्र्यांचे स्वागत केले. यावेळी नगराध्यक्ष डॉ. करण घुले, भाजप जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा, माऊली पेचे, मराठा महासंघाचे संभाजी दहातोंडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी आ. लंघे यांनी नेवासा तालुका हा संभाजीनगर व अहिल्यानगर जिल्ह्याच्या मध्यवर्ती भागात असून, येथे कृषी खात्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी उत्पादक केंद्र उभारण्यात यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे केली. या मागणीची दखल घेत मंत्र्यांनी राज्य शासनाकडून तातडीने अहवाल मागवून लवकरच आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. दरम्यान, महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील संघटनेचे राज्य सदस्य ॲड. सयाराम बानकर, माजी उपाध्यक्ष सुरेश बानकर, पोलीस पाटील रमेश डोळे, आसाराम कोरडे, सरपंच कैलास दरंदले यांनी देवस्थानचे माजी अध्यक्ष स्व. बाबुराव बानकर यांचा चरित्रग्रंथ केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांना भेट देऊन त्यांचा सन्मान केला. यावेळी मंत्री चौहान यांनी शनीभक्तांमध्ये जाऊन सेल्फी काढत संवाद साधला. परिसरात ‘‘जय श्रीराम’’ व ‘‘जय शनिदेव’’च्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. या प्रसंगी संभाजी दहातोंडे, नगराध्यक्ष डॉ. करण घुले, सचिन देसरडा, अंकुश म्हस्के, प्रताप चिंधे, किरण जाधव, राजेंद्र मते, डॉ. भारत करडक यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# लोकशाही उत्सव

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक - २०२५-२६







## माझी भुमिका, आपले प्रगतीपुस्तक



आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरणी नतमस्तक होण्याचा मला मान मिळाला. त्यांनी दिलेल्या पवित्र संविधानामुळेच आज माझ्यासारखा सामान्य कुटुंबातील व्यक्ती लोकशाही प्रक्रियेत सहभागी होऊ शकतो, निवडणूक लढवू शकतो आणि जनतेच्या सेवेसाठी उभा राहू शकतो. हेच संविधान माझ्यासाठी प्रेरणास्थान आहे आणि लोकशाहीचा आदर्श मार्गदर्शक आहे. याच संविधानाच्या मूल्यांवर विश्वास ठेवून, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), काँग्रेस पक्ष आणि मनसे या संयुक्त आघाडीच्या माध्यमातून मी अहिल्यानगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक १६ (ड) मधून निवडणूक लढवत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने ही जबाबदारी मला मिळाली, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. मी आतापर्यंत सामाजिक क्षेत्रात, विशेषतः आरोग्य क्षेत्रात, सातत्याने काम करत आलो आहे. सामान्य जनतेची सेवा हीच खरी ईश्वरसेवा मानूनच माझा आजपर्यंतचा प्रवास राहिला आहे. भविष्यातही प्रभागाचा सर्वांगीण विकास, मूलभूत सुविधा, स्वच्छता, आरोग्य आणि नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडवण्यासाठी मी कटिबद्ध आहे. केवळ निवडणूक जिंकणे नव्हे, तर २४ तास जनतेच्या सेवेत राहणे हेच माझे ध्येय आहे. शिवसेना पक्षावर माझी श्रद्धा आणि निष्ठा अढळ आहे. माजी दिवंगत मंत्री अनिल भैय्या राठोड यांच्या विचारांवर आणि संस्कारांवर मी ३० ते ३५ वर्षे शिवसैनिक म्हणून काम केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली काम करताना जनतेशी जोडले जाण्याची शिकवण मिळाली. आज पक्षाने एका सामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी देऊन कार्यकर्त्यांच्या विश्वासाला बळ दिले आहे. म्हणूनच, भूषणनगर, केडगाव व केडगाव उपनगरातील माझ्या सर्व मायबाप जनतेला मी कळकळीची विनंती करतो की, जनतेने सेवा करण्याची संधी द्यावीहीच नम्र अपेक्षा.

**डॉ. श्रीकांत चिमटे**
**उमेदवार, प्रभाग क्रमांक १६ (ड)**
**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)**




# 'तोच माणूस सुजाण, जो करतो मतदान'

## शहरात मतदार जनजागृती उपक्रम उत्साहात

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मतदान जनजागृती अभियानाअंतर्गत आज शहरात उत्साहपूर्ण वातावरणात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांची प्रभात फेरी, पथनाट्ये तसेच मतदान शपथ कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. ''स्वच्छ, सशक्त, सहभागी अहिल्यानगर प्रत्येक मत, प्रत्येक हक्क!'' या संदेशातून नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रभात फेरीद्वारे शहरातील विविध भागांतून घोषणाबाजी करत लोकांना मतदानासाठी प्रेरित केले. पथनाट्यांच्या माध्यमातून लोकशाहीतील मतदानाचे महत्त्व, नागरिकांची जबाबदारी आणि निष्क्रियतेचे दुष्परिणाम प्रभावीपणे मांडण्यात आले. या उपक्रमांत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत मतदान करण्याची शपथ घेतली. ''हे मतदान केवळ प्रतिनिधी निवडण्यासाठी नसून आपल्या शहराच्या विकासाची दिशा ठरवण्यासाठी आहे,'' असा संदेश यावेळी देण्यात आला. प्रत्येक मत महत्त्वाचे असून लोकशाही बळकट करण्यासाठी सर्वांनी आपला हक्क बजावावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले. महानगरपालिका निवडणूक पारदर्शक, शांततापूर्ण आणि जास्तीत जास्त मतदानासह पार पडावी, यासाठी प्रशासन आणि विविध स्वयंसेवी संस्था समन्वयाने जनजागृती उपक्रम राबवत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. या उपक्रमामुळे विशेषतः तरुण व नवमतदारांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले.

## आत्मसन्मानाचे नाव : विनितभाऊ



राज्यात सध्या महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तिकीट न मिळाल्याने सुरू असलेला राजकीय गोंधळ सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे. कुठे छाती बडवणे, कुठे भोवळ येणे, तर कुठे ओक्साबोक्शी रडत माध्यमांचे लक्ष वेधण्याचे प्रकार सुरू आहेत. अशा वातावरणात राजकारणात आत्मसन्मान, संयम आणि निर्णयक्षमतेचे दुर्मिळ उदाहरण समोर आले. तिकीट मिळण्याची शंभर टक्के शक्यता असतानाही आणि निवडून येण्याचा पूर्ण आत्मविश्वास असतानाही सभागृह तथा विरोधीपक्ष नेते विनितभाऊ पाउलबुद्धे यांनी स्वतःहून थांबण्याचा घेतलेला निर्णय अनेकांसाठी प्रेरणादायी ठरतो. सत्तेची संधी असूनही पदासाठी हट्ट न धरणे, हे आजच्या राजकारणात क्वचितच पाहायला मिळते. प्रभाग क्रमांक दोनचे लोकप्रिय नगरसेवक, विरोधी पक्षनेते तसेच सभागृह नेते म्हणून प्रभावी कामगिरी बजावलेले विनितभाऊ यांनी राजकारणात कुठे थांबायचे हे ओळखण्याची परिपक्वता दाखवली आहे. माणसाला योग्य वेळी थांबता आले, तर आयुष्यच नव्हे तर सार्वजनिक जीवनही अधिक सन्माननीय होते, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. तिकीट न मिळाल्याने गोंधळ घालण्याऐवजी आत्मसन्मान जपत शांतपणे निर्णय घेणे आणि त्यावर ठाम राहणे, यालाच खरे नेतृत्व म्हणावे लागेल. आज ज्या काळात पद, प्रतिष्ठा आणि सत्तेसाठी कोणतीही किंमत मोजण्याची तयारी दिसून येते, त्या काळात विनितभाऊ यांचा निर्णय वेगळा ठरतो. राजकारणातही मूल्ये, शिस्त आणि आत्मसन्मान जपता येतो, याचे हे जिवंत उदाहरण आहे. विनितभाऊ यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा.



**उद्धव काळापहाड**
९३९३८९५०५०
**खासबात**

### राष्ट्रवादीचे खाते उघडले, दोन उमेदवार बिनविरोध

# प्रभाग ८ मधून वाकळे, तर १४ मधून भागानगरे विजयी

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत मंगळवारी संपल्यानंतर बुधवारी अर्ज छाननीची प्रक्रिया पार पडली. सकाळपासून विविध प्रभागांमध्ये अर्जांवरील हरकती, आक्षेप आणि सुनावण्या सुरू होत्या. अनेक प्रभागांत उमेदवारांमध्ये चुरस पाहायला मिळाली. दरम्यान, प्रभाग क्रमांक ८ मधील ''ड सर्वसाधारण'' प्रवर्गात महत्त्वाची राजकीय घडामोड घडली आहे. अर्ज छाननीनंतर या प्रभागात सुरुवातीला दोन उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे कुमारसिंह बबनराव वाकळे आणि अपक्ष उमेदवार कोलते पोपट मुरलीधर यांचा समावेश होता. मात्र गुरुवारी सकाळी अपक्ष उमेदवार कोलते पोपट मुरलीधर यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने प्रभाग क्रमांक ८ मध्ये आता केवळ एकच उमेदवार शिल्लक राहिला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे उमेदवार कुमारसिंह वाकळे हे बिनविरोध निवडून आले आहेत. यामुळे अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे खाते उघडले आहे. दरम्यान, अहिल्यानगर महानगरपालिकेतील प्रभाग क्रमांक १४ मधूनही राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रकाश भागानगरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या विरोधातील उमेदवाराने अर्ज मागे घेतल्याने भागानगरे यांची निवड निर्विवाद ठरली आहे. त्यामुळे आतापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे दोन उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसचे एकूण ३४ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले असून, त्यापैकी दोन उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. दरम्यान, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत उद्या शुक्रवार, ता. २ जानेवारी रोजी संपत असून, उर्वरित उमेदवारांपैकी कितीजण माघार घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### मनसेचे दोन उमेदवार बेपत्ता

# निवडणूक बिनविरोध व्हावी म्हणून अपहरणाचा संशय

**अहमदनगर । रयत समाचार**



अहिल्यानगर महानगर पालिका निवडणुकीदरम्यान खळबळजनक प्रकार समोर आला असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून रिंगणात उतरलेले दोन उमेदवार अचानक बेपत्ता झाल्याची घटना उघडकीस आली आहे. गेल्या चोवीस तासांपासून संबंधित उमेदवारांचा त्यांच्या कुटुंबीयांशी कोणताही संपर्क झालेला नसल्याची माहिती मनसेचे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ आणि विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष सुमित वर्मा यांनी दिली. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून केडगाव परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.


बेपत्ता झालेल्या उमेदवारांमध्ये प्रभाग क्रमांक १७ मधील राहुल जाधव आणि अंबरनाथ भालसिंग यांचा समावेश आहे. यातील एक उमेदवार भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराविरोधात, तर दुसरा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराविरोधात निवडणूक लढवत होता. त्यामुळे निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठीच या दोघांचे अपहरण करण्यात आल्याचा गंभीर संशय व्यक्त करण्यात येत आहे. विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष सुमित वर्मा यांनी याबाबत तीव्र प्रतिक्रिया देत ही घटना लोकशाही प्रक्रियेवर घाला घालणारी असल्याचा आरोप केला. उमेदवारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून त्यांच्या जीविताला धोका असल्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर मनसेचे पदाधिकारी थेट कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल झाले. त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेऊन तातडीने गुन्हा दाखल करून सखोल तपास करण्याची मागणी केली आहे.

निवडणूक प्रक्रियेत अशा प्रकारे दबाव, भीती किंवा अपहरणाचे प्रकार घडत असतील तर ती लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक बाब असल्याचेही मनसेकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, या प्रकरणात पोलीस प्रशासन नेमकी कोणती कारवाई करणार, बेपत्ता उमेदवारांचा शोध कधी लागणार आणि आरोपांमध्ये तथ्य आहे का, याकडे संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# निवडणूक यंत्रणेचा गोंधळ चव्हाट्यावर

**अहमदनगर । रयत समाचार**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा फटका शिक्षकांना बसत असून, प्रशिक्षणाला उपस्थित राहूनही काही शिक्षकांना गैरहजेरीच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. काहींना तर अधिकृत नेमणूक आदेश नसतानाही ड्युटी लावल्याच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत. सेवेत नसलेले तसेच विना अनुदानित शाळांतील शिक्षकांनाही नोटीसा पाठविल्याने मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. या चुकीमुळे शिक्षकांना खुलासासाठी महापालिकेच्या फेऱ्या माराव्या लागत असून मानसिक ताण व वेळेचा अपव्यय होत आहे. निवडणूक प्रक्रियेत अशा प्रकारचा ढिसाळ कारभार झाल्यास व्यवस्थेची विश्वासार्हता धोक्यात येईल, अशी भावना शिक्षकांकडून व्यक्त होत आहे. चुकीच्या नोटीसा तात्काळ मागे घ्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. अहिल्यानगर माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे यांनी सांगितले की, निवडणूक काळात शिक्षकांवर मोठा ताण येतो. अपुरी कर्मचारीसंख्या, वेळेवर सुविधा न मिळणे आणि अनावश्यक नोटीसा यामुळे अडचणी वाढत आहेत. निवडणूक कामासाठी केवळ २० टक्के शिक्षक घ्यावेत व उर्वरित कर्मचारी इतर विभागांतून नियुक्त करावेत, अशी मागणी त्यांनी केली.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
**जगदंबा टी सेंटर**
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

**हॉटेल भाड्याने देणे**
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११९३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# आद्यनृत्यांगणा पवळा स्मारकासाठी निधी उपलब्ध करून देणार- पालकमंत्री विखे

## हिवरगाव पावसा-देवगड पुलाचे उद्घाटन



**संगमनेर । नितीन भालेराव**

संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा येथील देवगड देवस्थान रस्त्यावरील पुलाचे उद्घाटन जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना विखे म्हणाले की, चंदनापुरी, सावरगावतळ, झोळे, हिवरगाव पावसा व शिरापूर या गावांना शाश्वत पाणीपुरवठा मिळावा यासाठी निळवंडे कालव्यावरून उपसा सिंचन योजना राबविण्यास तत्त्वतः मान्यता देण्यात आली असून, याबाबत आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात येईल. तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात मोलाचे योगदान देणाऱ्या तमाशा कलाक्षेत्रातील प्रथम महिला कलाकार आद्यनृत्यांगणा पवळा भालेराव हिवरगावकर यांच्या जन्मभूमीत भव्य स्मारक उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे अभिवचनही त्यांनी ग्रामस्थांना दिले. हिवरगाव पावसा ते देवगड देवस्थान दरम्यान ओढ्यावर असलेला जुना लहान पूल पावसाळ्यात पुराच्या पाण्याखाली जात असल्याने विद्यार्थ्यांना, दुचाकीस्वारांना व स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन सामाजिक संस्था, संघटना व पत्रकारांनी सातत्याने आवाज उठवला होता. त्यानंतर भाजपाचे जिल्हा पदाधिकारी काशिनाथ पावसे यांनी ही समस्या विखे यांच्या निदर्शनास आणून दिली. भाजपाचे तालुका सरचिटणीस गणेश दवंगे, सरपंच सुभाष गडाख, केशव दवंगे, सोमनाथ भालेराव आदी पदाधिकारी व ग्रामस्थांनी सातत्याने पाठपुरावा केला. पालकमंत्री विखे व आ. अमोल खताळ यांच्या सहकार्यामुळे हिवरगाव पावसादेवगड रस्त्यावरील उंच पुलासाठी अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, त्या पुलाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्रमोद रहाणे, रामभाऊ रहाणे, श्याम रहाणे, काशिनाथ पावसे, गणेश दवंगे, सुभाष गडाख, सुजाता दवंगे, गोविंद खर्डे, अंकुश रहाणे, किसन सरोदे, नितीन रहाणे, केशव दवंगे, सोमनाथ भालेराव, गणेश पावसे, प्रकाश पावसे, कैलास दिवटे, किरण पावसे, सुरेश पावसे, मच्छिंद्र पावसे, सचिन सस्कर, चंद्रशेखर गडाख, उत्तम जाधव, विलास पावसे, अशोक पावसे, अशोक गोफणे, बजरंग पावसे, रवींद्र पावसे, दीपक भालेराव, भाऊसाहेब बोऱ्हाडे, विनोद पावसे, माधव दवंगे, बाळासाहेब भालेराव, सोमनाथ दवंगे, सुधाकर पावसे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नवीन वर्षाचे स्वागत पर्यावरण संवर्धनाने

## इसळक येथे लोकसहभागातून वृक्षारोपण

**नगर तालुका । रयत समाचार**

दिवसेंदिवस वाढत असलेल्या तापमानवाढीचे दुष्परिणाम सध्या सर्वत्र जाणवत असून, लहरी हवामानामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची नितांत गरज असल्याचे मत हभप संदीप महाराज कळसे यांनी व्यक्त केले. तालुक्यातील इसळक येथील गोसावीबाबा मंदिर परिसरात लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कैलास लांडे, पोपट खामकर, सुभाष कोरडे, काका लगड, कृषी सहाय्यक चैतन्य बडवे, रामदास कोतकर, इंजि. मयूर खुंटाळे, नामदेव लोंढे, मारुती दिवेकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना कळसे महाराज म्हणाले की, तरुणांनी एकत्र येऊन राबविलेला हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असून पर्यावरण संवर्धनासाठी लोकचळवळ उभी राहणे गरजेचे आहे. पर्यावरण रक्षण म्हणजे केवळ वृक्षारोपण नव्हे, तर कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, ध्वनी, जल व वायू प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. यावेळी साहित्यिक रामदास कोतकर यांनी सांगितले की, लग्न समारंभ, वाढदिवस, दशक्रिया व पुण्यस्मरण कार्यक्रमांतील अनावश्यक खर्च टाळून पर्यावरणपूरक उपक्रमांना प्राधान्य दिल्यास समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव गवळी यांनी केले, तर देवस्थान समितीचे मुख्य संयोजक संतोष दत्तात्रय गेरंगे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बाप्पू गेरंगे, सरोदास कोतकर, अशोक गेरंगे, प्रमोद गेरंगे, रोहन गेरंगे, अक्षय गेरंगे, शरद खेसे, भानुदास कोतकर, राहुल गेरंगे आदींनी विशेष परिश्रम घेतले. दरम्यान, नववर्षाचे स्वागत करत लावण्यात आलेली सर्व झाडे जगावीत यासाठी मंदिर परिसरात तारेचे कुंपण करण्यात आले असून ठिबक सिंचनाद्वारे पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. आत्मनिर्धार फाउंडेशन संचलित पर्यावरण संवर्धन समितीच्या माध्यमातून या झाडांच्या संगोपनाची जबाबदारी घेण्यात आली आहे. पुढील काळात इतर सार्वजनिक मोकळ्या जागांवरही वृक्षारोपण करण्याचा मानस असल्याची माहिती पर्यावरण संवर्धन समितीचे अध्यक्ष भानुदास कोतकर यांनी दिली.

# अर्जुन घुगे यांचा गंगाई-बाबाजी आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान



**शेवगाव । शिवाजी घुगे**

शेवगाव तालुक्यातील एकनाथ माध्यमिक विद्यालय, एरंडगाव येथील सहशिक्षक अर्जुन देविदास घुगे यांना यावर्षीचा राज्यस्तरीय गंगाईबाबाजी आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. शेतकरी प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मा. आ. भीमराव धोंडे, शिक्षण समितीचे सभापती श्री. बेग, श्रीमती धोंडे तसेच ज्येष्ठ पत्रकार श्री. बोडखे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमात सामाजिक, पत्रकारिता व शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अनेक मान्यवरांना आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये अर्जुन घुगे यांच्या शैक्षणिक, साहित्यिक व सामाजिक कार्याचा विशेष गौरव करण्यात आला. पुरस्कार प्रदान करताना त्यांच्या लेखन कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला. त्यांनी लिहिलेली Let's Learn English कॉ. कृष्णा (अण्णा) पवार तसेच कामगार नेते काटे मामा ही पुस्तके शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उपयुक्त ठरत असल्याचे सांगण्यात आले. तसेच कोरोना काळात त्यांनी सुरू केलेल्या यूट्यूब शिक्षण चॅनेलद्वारे विद्यार्थ्यांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचाही गौरव करण्यात आला. त्यांच्या सामाजिक योगदानाचा उल्लेख करताना त्यांनी स्थापन केलेल्या 'ज्ञानेश्वरी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था' मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे विशेष कौतुक करण्यात आले. याच कार्यक्रमात न्यू इंग्लिश स्कूल, खरडगाव येथील सहशिक्षिका श्रीमती आशाताई फड यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल त्यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी अर्जुन घुगे यांचे वडील देविदास घुगे, आई सुबिद्रा घुगे, पत्नी शिक्षिका कविता घुगे, भाऊ शिवाजी घुगे, स्नेही भगवानराव फुंदे, दीपक जायभाये आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## शब्दांवर प्रभुत्व, विषयावर सखोल अभ्यास

# दीपक कुसळकर यांचे सूत्रसंचालन ठरतेय कार्यक्रमाचे भूषण

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

तालुक्याला लाभलेले अभ्यासू, प्रभावी आणि बहुआयामी सूत्रसंचालक म्हणून दीपक कुसळकर यांचे नाव आज केवळ तालुक्यापुरते मर्यादित न राहता संपूर्ण जिल्हाभरात घेतले जाते. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय तसेच सार्वजनिक स्वरूपाच्या कोणत्याही कार्यक्रमात त्यांच्या सूत्रसंचालनामुळे कार्यक्रमाला वेगळी उंची प्राप्त होते. कार्यक्रम कोणत्या विषयावर आधारित आहे, त्यामागील भूमिका काय आहे.



तसेच उपस्थित मान्यवरांची पार्श्वभूमी काय आहे, याचा सखोल अभ्यास करूनच दीपक कुसळकर सूत्रसंचालन करतात. तालुका व जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील बहुतांश व्यक्तिमत्त्वांचा त्यांना सखोल परिचय असल्याने कोणत्या क्षणी कोणाचा उल्लेख करावा, कसा आणि कितपत करावा, याचे अचूक भान त्यांच्या निवेदनातून प्रकर्षाने दिसून येते. त्यांची शब्दसंपदा, आशयपूर्ण वाक्यरचना, नेमकी शब्दनिवड, यमकयुक्त आणि प्रभावी मांडणी यामुळे निवेदन अधिक परिणामकारक ठरते. विषयाशी सुसंगत अशी भाषाशैली, आशयाला साजेसे संदर्भ आणि श्रोत्यांना गुंतवून ठेवणारी मांडणी ही त्यांच्या सूत्रसंचालनाची खास वैशिष्ट्ये मानली जातात. कार्यक्रमाची सुरुवात असो वा समारोप, गंभीर विषय असो वा आनंदाचा प्रसंगप्रत्येक टप्प्यावर त्यांच्या शब्दांना वजन, आशयाला खोली आणि मांडणीला शिस्त असते. वेळेचे काटेकोर नियोजन, वक्त्यांचा योग्य सन्मान, श्रोत्यांची मानसिकता ओळखून साधलेला संवाद आणि प्रसंगानुरूप केलेले सूचक, सभ्य विनोद यामुळे कार्यक्रम अधिक प्रभावी व संस्मरणीय ठरतो. त्यामुळेच दीपक कुसळकर यांच्या सूत्रसंचालनामुळे कोणताही कार्यक्रम अधिक दर्जेदार आणि प्रभावी होतो, असे आयोजक व मान्यवर आवर्जून नमूद करतात. या सर्व गुणवैशिष्ट्यांमुळे दीपक कुसळकर यांची मागणी शेवगाव तालुक्यासह इतर तालुके व संपूर्ण जिल्ह्यात सातत्याने वाढत असून, शेवगाव तालुक्याच्या सांस्कृतिक व बौद्धिक क्षेत्रात त्यांनी आपल्या उत्कृष्ट सूत्रसंचालनातून एक स्वतंत्र व ठसा उमटवणारी ओळख निर्माण केली.



# महिला बचत गटांचा मुख्यमंत्री राजस्व अभियानाला हातभार

**नगर तालुका । रयत समाचार**

महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री राजस्व अभियानाला बळकटी देण्यासाठी नगर तालुक्यातील मांजरसुंबा येथील महिला बचत गटांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. या अभियानाअंतर्गत राजस्व वसुली, नोंदी सुधारणा तसेच जनजागृतीसाठी ३० महिला बचत गटांनी एकत्र येत ३० हजार रुपयांचे योगदान दिले.

या बचत गटांच्या सदस्यांनी गावागावात जाऊन नागरिकांना राजस्वविषयक कामकाजाबाबत जनजागृती केली. जमीन नोंदी, कर भरणा आदी प्रकरणे वेळेत पूर्ण करण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करण्यात आले. यासोबतच स्वतः च्या बचतीतून अभियानातील विविध उपक्रमांसाठी आर्थिक मदत देत त्यांनी सामाजिक जबाबदारीचे भान दाखवले आहे. तालुका स्तरावरून मिळालेल्या माहितीनुसार, हे ३० बचत गट गेल्या काही महिन्यांपासून सक्रियपणे कार्यरत असून मुख्यमंत्री राजस्व अभियानाला गती देण्याचे काम करत आहेत. महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याबरोबरच शासनाच्या विविध उपक्रमांशी त्यांचा सहभाग वाढवणे हे या प्रयत्नांचे मुख्य उद्दिष्ट आहे. यावेळी उपसरपंच जालिंदर कदम यांनी सांगितले की, महिला बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण होत असून शासनाच्या अभियानाला सहकार्य करणे हे आपले कर्तव्य आहे. मुख्यमंत्री राजस्व अभियान राज्यातील राजस्व व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल असून, त्यामध्ये महिला बचत गटांचा सहभाग प्रेरणादायी ठरत आहे.

# मेहनत, निष्ठा, सेवाभावातूनच खरा विकास- नागवडे



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

मेहनत, निष्ठा आणि सेवाभाव या त्रिसूत्रीवरच खरा आणि शाश्वत विकास उभा राहतो, असे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका अनुराधा राजेंद्र नागवडे यांनी केले.. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत व श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने उक्कडगाव येथे आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. हा समारोप कार्यक्रम बुधवार, ता. ३१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता उत्साहात पार पडला.

'शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट आणि पडीक जमीन व्यवस्थापन' या संकल्पनेवर आधारित हे शिबिर ता. २१ ते ३१ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवनशैलीचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. घरापासून दूर राहून स्वतःची कामे स्वतः करणे, नियोजनबद्ध दिनचर्या पाळणे तसेच ग्रामस्थांचे जीवन जवळून पाहण्याची संधी स्वयंसेवकांना मिळाली. अध्यक्षीय भाषणात नागवडे म्हणाल्या की, राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, शिस्त, नेतृत्वगुण व सामाजिक बांधिलकी निर्माण होते. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी युवकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. ग्रामस्थांमध्ये सचिन कातोरे व शंकर गोलांडे यांनी मनोगत व्यक्त केले. या कालावधीत एनएसएस स्वयंसेवकांनी श्रमदान, स्वच्छता मोहीम, पाणलोट क्षेत्र जनजागृती, पडीक जमीन व्यवस्थापन, वृक्षलागवड, प्रभातफेरी, व्याख्यानमाला तसेच विविध सामाजिक प्रबोधनात्मक उपक्रम यशस्वीरीत्या राबविले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक ऐक्याबाबत सकारात्मक जागृती निर्माण झाल्याचे मान्यवरांनी नमूद केले. कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य सतीशचंद्र सूर्यवंशी व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी यांनी स्वयंसेवकांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी उपप्राचार्य चंद्रभान कातोरे तसेच उक्कडगाव ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले. यावेळी दत्तात्रय कातोरे, प्रसाद महादिक, पारा जी कामोरे, गणेश महाडिक, एकनाथ करांडे, बापूराव कातोरे, प्रविण कातोरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मनोहर सूर्यवंशी, डॉ. मिलिंद बेडसे, डॉ. मुकुंद भोस, डॉ. योगेश अहिरे, प्रा. प्रविण नागवडे, प्रा. कोमल कांबळे, प्रा. वैभवी साबळे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शंकर गवते यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. चंद्रभान कातोरे यांनी केले. समारोप कार्यक्रमास ग्रामस्थ, विद्यार्थी, स्वयंसेवक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिबिरादरम्यान 'घासावा शब्द, तासावा शब्द', 'पाणी-वाणी-नाणी नासू नये', 'युवकांनो जागे व्हा', पर्यावरण संवर्धन, व्यक्तिमत्त्व विकास, आरोग्यधन संपदा आदी विषयांवर विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले.**

# तात्काळ तिकीटासाठी ओटीपी सक्ती

## दलालांवर आळा घालण्यासाठी रेल्वेचा नवा नियम

**बेलापूर । शफीक बागवान**

भारतीय रेल्वेने ऑनलाईन तात्काळ तिकीट काऊंटरच्या नियमांमध्ये बदल केल्यानंतर आता आरक्षण काऊंटरवर तात्काळ तिकीट काढण्याच्याही नियमांमध्ये बदल केला आहे.

रेल्वेच्या तात्काळ तिकीट बुकिंग प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि दलालांकडून होणारा गैरवापर रोखण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने मोठा निर्णय घेतला आहे. आरक्षण काउंटरवरून तात्काळ तिकीट घेण्यासाठी प्रवाशांना ओटीपी (OTP) पडताळणी अनिवार्य असेल. आरक्षण फॉर्ममध्ये दिलेल्या मोबाईल क्रमांकावर ओटीपी येईल आणि तो यशस्वीरीत्या पडताळल्यानंतरच तिकीट कन्फर्म केले जाईल. सुरुवातीला काही गाड्यांमध्ये लागू असलेली ही प्रणाली आता ५२ गाड्यांपर्यंत वाढवण्यात आली असून येत्या काही दिवसांत देशातील सर्व गाड्यांमध्ये लागू होणार आहे. या उपक्रमाचा उद्देश दलालांकडून होणारी लास्ट-मिनिट तिकीट बुकिंगची गैरव्यवहार प्रक्रिया थांबवणे आहे. रेल्वे मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, आरक्षण काउंटरवर तात्काळ तिकीट बुक करताना प्रवाशाने दिलेल्या मोबाईल क्रमांकावर ओटीपी पाठवला जाईल.कर्मचाऱ्याला हा ओटीपी सांगून पडताळणी झाल्यानंतरच तिकीट दिले जाईल.

ओटीपी न पडताळल्यास तिकीट कन्फर्म होणार नाही. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, दलालांकडून बनावट मोबाइल क्रमांक किंवा अपूर्ण माहिती देऊन मोठे प्रमाणात तिकीट बुक करण्यावर हा उपाय प्रभावी ठरेल आणि प्रत्यक्ष प्रवाशांना समान संधी मिळेल. गेल्या काही महिन्यांपासून मंत्रालयाकडून विविध कडक उपाययोजना केल्या जात आहेत. या उपायांमुळे तात्काळ तिकीट प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित व प्रवाशांसाठी सुलभ होईल असे अधिकाऱ्यांचे मत आहे.

# स्वतःची माहिती वापरणाऱ्या प्रणालींसाठी सैद्धांतिक मर्यादा

## नव्या अभ्यासातून महत्त्वपूर्ण निष्कर्ष

**अहमदनगर । आबीद खान**



कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणकीय प्रणाली, सामाजिक संस्था तसेच आधुनिक प्रशासकीय व्यवस्था यांच्यात एक महत्त्वाचे समान वैशिष्ट्य आढळून येते. या सर्व प्रणाली स्वतःबद्दलची माहिती साठवतात, स्वतःचे नियम तपासतात आणि त्या आधारे स्वतःमध्ये बदल घडवून आणतात. मात्र अशा स्वतःवरच प्रक्रिया करणाऱ्या प्रणाली किती काळ सुसंगत, स्थिर व विश्वासार्ह राहू शकतात, हा प्रश्न दीर्घकाळापासून शास्त्रीय चर्चेचा विषय राहिला आहे. या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या एका नव्या सैद्धांतिक अभ्यासात, स्वतःची माहिती वापरणाऱ्या प्रणालींसाठी एक मूलभूत मर्यादा अस्तित्वात असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या अभ्यासातील तांत्रिक सिद्धांत सध्या आयईईई (IEEE) या आंतरराष्ट्रीय शास्त्रीय जर्नलमध्ये तज्ज्ञांच्या समिक्षेसाठी (Peer Review) सादर करण्यात आला आहे. या संशोधनानुसार, जेव्हा एखादी प्रणाली स्वतःबद्दल माहिती साठवते, त्या माहितीची सतत तपासणी करते आणि त्यावर आधारित निर्णय घेते, तेव्हा त्या प्रक्रियेला एक ठरावीक सैद्धांतिक मर्यादा येऊन ठेपते. ही मर्यादा ओलांडल्यानंतर संबंधित प्रणाली पूर्वीप्रमाणे एकसंध, स्थिर आणि विश्वासार्ह पद्धतीने कार्य करू शकत नाही. अशा परिस्थितीत प्रणालीला तिची अंतर्गत रचना, नियम किंवा कार्यपद्धतीत बदल करणे अपरिहार्य ठरते. या अभ्यासाचे वैशिष्ट्य म्हणजे हे निष्कर्ष कोणत्याही विशिष्ट यंत्र, संगणक कार्यक्रम, अल्गोरिदम किंवा प्रयोगावर आधारित नसून, सर्वसाधारण सैद्धांतिक तत्त्वांवर आधारित आहेत. त्यामुळे हा सिद्धांत केवळ एखाद्या विशिष्ट तंत्रज्ञानापुरता मर्यादित न राहता, स्वतःवर प्रक्रिया करणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रणालींना लागू होतो. या सैद्धांतिक निष्कर्षांचा उपयोग कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली अधिक स्थिर व विश्वासार्ह बनवण्यासाठी, मोठ्या सामाजिक व प्रशासकीय संस्थांचे कार्य समजून घेण्यासाठी तसेच दीर्घकालीन स्थैर्य आणि आवश्यक बदल यांमधील समतोल स्पष्ट करण्यासाठी होऊ शकतो. विशेषतः ज्या प्रणाली दीर्घकाळ स्वतःचे निर्णय स्वतःच घेतात किंवा स्वतःचे नियम सातत्याने सुधारत राहतात, अशा प्रणालींसाठी मर्यादा ओळखणे, टप्प्याटप्प्याने पुनर्रचना करणे आणि संतुलन राखणे अत्यावश्यक असल्याचे या संशोधनातून अधोरेखित करण्यात आले आहे. या अभ्यासाचा सविस्तर तांत्रिक तपशील समिक्षा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शास्त्रीय स्वरूपात प्रसिद्ध करण्यात येणार असून, त्यानंतर या सिद्धांतावर अधिक व्यापक चर्चा व पुढील संशोधन होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : प्रमोद सुमन श्रीधर जाधव, मो. ९२७२०७९८६९ / ८३२९३९४१२५, ई-मेल : jadhav.009@gmail.com

# शौर्याला मानवंदना, सेवेला सलाम

## ढवळगाव येथे शौर्यदिनानिमित्त अन्नदान

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**



भीमा कोरेगाव शौर्यदिन हा केवळ ऐतिहासिक स्मरणदिन नसून सामाजिक बांधिलकी, समता आणि मानवतेचा संदेश देणारा दिवस असल्याचे पुन्हा एकदा ढवळगाव येथे दिसून आले.

एरंडोली येथील माता रमाई व माता भिमाई महिला बचत गटांच्या वतीने भीमा कोरेगाव शौर्यदिनानिमित्त तालुक्यातून मानवंदना देण्यासाठी जाणाऱ्या भीम अनुयायांसाठी ढवळगाव येथे चहा व नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती. महिला बचत गटांनी राबवलेले हे अन्नदान उपक्रम शौर्याला केवळ शब्दांत नव्हे, तर सेवाभावातून दिलेले सच्चे अभिवादन ठरले. भीम अनुयायांच्या प्रवासात दिलेला हा अल्पोपहार समता, बंधुता आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा ठरला. अशा उपक्रमांमुळे समाजात सेवाभाव व सामाजिक जाणीव अधिक दृढ होत असल्याचे नागरिकांनी नमूद केले. भीमा कोरेगाव येथे मानवंदना देण्यासाठी तालुक्यातून मोठ्या संख्येने भीम अनुयायी जात असतात. या वेळी महिला बचत गटांनी केलेल्या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

श्रीगोंदा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष पंकज गणवीर यांच्या हस्ते दोन्ही बचत गटांच्या अध्यक्षांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. माता रमाई बचत गटाच्या अध्यक्षा मिना राजू शिंदे तसेच माता भिमाई बचत गटाच्या अध्यक्षा मंदा संतोष शिंदे यांचा लता संजय औचिते यांच्या हस्ते शाल-श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मिना नितीन शिंदे, गौरी शिंदे, दिपाली शेंडगे, मनीषा थोरात, लता संजय औचिते, पोपट शिंदे, राजेंद्र शिंदे, बापू बोरगे, विठ्ठल शिंदे, भाऊसाहेब शिंदे, सुनील शिंदे, जवाहर पठारे आदींनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष संतोष जौंजाळ, श्रीगोंदा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष पंकज गणवीर, सुनील शिंदे, राहुल बोरगे, बाळासाहेब पठारे, सोन्याबापू बोरगे यांच्यासह परिसरातील नागरिक व मोठ्या संख्येने भीम अनुयायी उपस्थित होते.

# रविवारी मैत्री कट्ट्याचा 'उत्सव मैत्रीचा'

## कला, संगीत, साहित्याचा अनोखा संगम

**अहमदनगर । रयत समाचार**



गीता भावसार



राजू काजे



निलेश जाधव

मैत्री कट्टा संस्थेच्या 'उत्सव मैत्रीचा' या वार्षिक सोहळ्यात यंदा कला, संगीत आणि साहित्य यांचा अनोखा त्रिवेणीसंगम अनुभवायला मिळणार आहे.

रविवार, ता. ४ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता येथील माऊली सभागृहात आयोजित या कार्यक्रमास प्रसिद्ध लेखिका गीता भावसार, किशोर कुमार शैलीतील ख्यातनाम गायक लक्ष्मीकांत उर्फ राजू काजे तसेच प्रसिद्ध व्यंगचित्रकार निलेश जाधव हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. 'तोरण बांधूया मैत्रीचे' या ब्रीदवाक्याअंतर्गत आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून दरवर्षी जानेवारी महिन्यात संक्रांतीपूर्वीच्या रविवारी मैत्री कट्ट्याचा वार्षिक सोहळा साजरा केला जातो. या माध्यमातून नगरकरांना विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळते. यंदाच्या कार्यक्रमात कला, संगीत आणि साहित्य या तीन वेगवेगळ्या क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तिमत्त्वांचे सान्निध्य लाभणार आहे. 'पिनाक अकॅडमी'च्या संस्थापिका गीता भावसार या संगणक अभियांत्रिकी पदवीधर असून भौतिकशास्त्र व गणित विषयातील तज्ज्ञ आहेत. जनमंगल व वनराई या मासिकांमध्ये त्यांचे नियमित लेखन प्रसिद्ध होत असते. निसर्ग शिबिरे, फिल्म क्लब आदी उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले असून त्यांना विविध आदर्श शिक्षिका पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

लक्ष्मीकांत उर्फ राजू काजे हे तलाठी पदावर कार्यरत असून, १९९४ मध्ये झी टीव्हीच्या 'क्लोजअप अंताक्षरी' या कार्यक्रमात त्यांनी उपविजेतेपद पटकावले होते. त्यांना 'राष्ट्रीय कला सन्मान २०२४' तसेच 'व्हॉइस ऑफ किशोर कुमार २०२५' या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. सोनी टीव्हीवरील 'इंडियाज गॉट टॅलेंट' या कार्यक्रमातही त्यांनी उल्लेखनीय सादरीकरण केले आहे. निलेश जाधव हे जे.जे.

इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट, मुंबई येथून पदवीधर असून ते चित्रकार, व्यंगचित्रकार व सुलेखनकार म्हणून कार्यरत आहेत. वृत्तपत्र, जाहिरात, प्रकाशन व चित्रपट क्षेत्रात त्यांचा सुमारे २५ वर्षांचा अनुभव असून त्यांच्या कलाकृती अमिताभ बच्चन, गुलजार, नाना पाटेकर यांच्यासह अनेक नामवंतांच्या खासगी संग्रहात समाविष्ट आहेत. नववर्षाच्या प्रारंभी आयोजित या सांस्कृतिक मेजवानीला अहिल्यानगरकरांनी मित्रपरिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त मैत्री कट्टा परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.



# समृद्धी ट्रेकिंग ग्रुपकडून निसर्गाच्या सानिध्यात नववर्षाचे स्वागत

**नगर तालुका । रयत समाचार**

हॉटेल किंवा रिसॉर्टमधील महागड्या पार्टीऐवजी निसर्गाच्या सानिध्यात शेकोटी, जीवनातील गोड आठवणी आणि घरून आणलेले जेवण अशा साध्या पण समृद्ध पद्धतीने पिंपळगाव माळवी येथील समृद्धी ट्रेकिंग ग्रुपने २०२६ या नववर्षाचे स्वागत केले. टेंभी खंडोबा डोंगरावर आयोजित करण्यात आलेल्या या ट्रेकमध्ये ग्रुपच्या सदस्यांनी शून्य खर्चात नव्या वर्षाची सुरुवात करत पर्यावरणप्रेम आणि साधेपणाचा संदेश दिला. ट्रेकिंगप्रेमी सदस्य ३१ डिसेंबरच्या संध्याकाळी टेंभी खंडोबा येथे पोहोचले. तेथे शेकोटी पेटवून थंडगार वातावरणात सर्वजण एकत्र बसले आणि जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. हसणे, खिदळणे, गप्पा आणि गाण्यांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. जेवणासाठी सर्व सदस्यांनी घरूनच पोळ्या, भाज्या, चटण्या व मिठाया आणल्या होत्या. ''महागड्या पार्टीऐवजी निसर्गाच्या सानिध्यात मित्रमंडळींसोबत नववर्षाचे स्वागत करणे हाच खरा आनंद आहे,'' असे मत ग्रुपच्या सदस्यांनी व्यक्त केले.पिंपळगाव माळवी येथील समृद्धी ट्रेकिंग ग्रुप हा उत्साही तरुणांचा समूह असून निसर्गप्रेम, ट्रेकिंग आणि साहसी उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन व साध्या जीवनशैलीचा प्रसार करण्याचे कार्य करतो. अशा उपक्रमांतून होणारी बचत समाजोपयोगी कार्यासाठी खर्च केली जाते. या उपक्रमाचे स्थानिक नागरिकांनी स्वागत केले आहे. दिपाली गायकवाड (ट्रेकर) म्हणाल्या, ''मी कंपनीत नोकरी करते. त्यामुळे बाहेर फिरण्यासाठी फारसा वेळ मिळत नाही. मात्र जवळच्या परिसरात अशा प्रकारचे उपक्रम झाल्यामुळे स्थानिक पर्यटनाला चालना मिळते.'' शैलेंद्र काळे यांनी सांगितले की, ''आमचा ग्रुप शून्य बजेटमध्ये परिसरातील निसर्गरम्य ठिकाणांना भेट देतो तसेच त्या परिसराची स्वच्छता व निगा राखण्याचे काम करतो.''

# चौथे युगस्त्री फातिमाबी शेख साहित्य संमेलनाध्यक्षपदी कवयित्री मेहमूदा शेख

## डॉ. श्रीपाल सबनीस, प्रा. तांबोळी, पत्रकार नल्लामंदू यांची प्रमुख उपस्थिती

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था, महाराष्ट्र शाखा श्रीरामपूर यांच्या वतीने रविवार, ता. ११ जानेवारी २०२६ रोजी श्रीरामपूर येथे राज्यस्तरीय चौथे युगस्त्री फातिमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले. या साहित्य संमेलनाध्यक्षपदी देहू येथील सुप्रसिद्ध साहित्यिक व लेखिका मेहमूदा शेख यांची निवड करण्यात आली असून स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. सलीम शेख, तर कार्याध्यक्षपदी कवयित्री दिलशाद शेख व कवी रज्जाक शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती संस्थेच्या सहसचिव अनीसा सिकंदर व उपाध्यक्ष खाजाभाई बागवान यांनी दिली. भारतातील पहिल्या मुस्लिम मराठी शिक्षिका युगस्त्री फातिमाबी शेख यांच्या जयंतीनिमित्त हे एकदिवसीय साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक तथा ८९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ. शफी बोल्डेकर, हाशम पटेल, इस्माईल शेख, प्राचार्य डॉ. ई. ज्या. तांबोळी, ज्येष्ठ पत्रकार अय्युब अहमद नल्लामंदू आदी मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या साहित्य संमेलनात पुस्तक प्रकाशन, स्मरणिका प्रकाशन, विविध पुरस्कारांचे वितरण तसेच विविध विषयांवर विचारमंथन होणार आहे. यासोबतच कवयित्री व मुख्याध्यापिका नूरजहाँ शेख यांच्या अध्यक्षतेखाली भव्य कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून, राज्यभरातून ५० हून अधिक कवी यात सहभागी होणार आहेत. हे साहित्य संमेलन ऑकेजन बँक्वेट हॉल, एच.पी. गॅस शेजारी, बेलापूर रोड, श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर येथे होणार आहे. सकाळच्या सत्रात उद्घाटन, इंतेखाब फराश यांच्या सहकार्याने 'स्पंदन' स्मरणिकेचे प्रकाशन तसेच मान्यवरांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन होणार आहे. ॲड. सिकंदर शेख यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा समाजसेवा पुरस्कार शेख शहाजान फकीर (अहमदनगर) यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसेच युगस्त्री फातिमाबी शेख साहित्य पुरस्कार कवयित्री सायराबानू चौगुले यांना, तर मा. हुसेनसाब बागवान यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार शिक्षक व गझलकारा निलोफर फणीबंद यांना प्रदान करण्यात येणार आहे. दुपारच्या सत्रात होणाऱ्या कवी संमेलनात राज्यातील विविध भागांतून आलेले कवी सहभागी होणार असून, साहित्यिक अभिव्यक्तीचा समृद्ध आविष्कार अनुभवायला मिळणार आहे. हे एकदिवसीय साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी स्वागताध्यक्ष डॉ. सलीम शेख, अहमदनगर जिल्हाध्यक्षा दिलशाद सय्यद, कार्याध्यक्ष रज्जाक शेख आदी प्रयत्नशील असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. या साहित्य संमेलनास साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्थेचे मुख्य संयोजक जिल्हाध्यक्ष दिलशाद सय्यद व डॉ. सलीम शेख यांनी केले.

# बद्रीनारायण पलोड यांचे वैकुंठगमन

## आद्य क्रिकेट समालोचक हरपला

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी शहरातील लोकप्रिय व्यक्तिमत्व व आद्य क्रिकेट समालोचक बद्रीनारायण पलोड यांचे नुकतेच वैकुंठगमन झाले. त्यांच्या अकाली निधनाने शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत



आहे. ते स्वतःही एक प्रतिभासंपन्न क्रिकेटपटू होते. क्रिकेट हा त्यांचा व्यासंग असल्याने ते या क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत होते. मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषेत ते क्रिकेटचे रसाळ भाषेत समालोचन करत असत. बद्रीनारायण पलोड एक हुशार सत्यनिष्ठ व हळवे व्यक्तिमत्व होते. जगन्नाथ शंकरशेठ पलोड हे पाथर्डीतील पहिले किराणा व्यावसायिक होते. त्यांची १५० वर्षाची ही परंपरा बद्रीशेठ पलोड व सोमनाथ पलोड यांनी तिसऱ्या पिढीपर्यंत कायम ठेवली आहे. त्यांनी कला शाखेची दुहेरी पदवी प्राप्त केली होती. पदवीसाठी इंग्रजी हा खास विषय निवडल्याने त्यांची इंग्रजीवर जबरदस्त पकड होती. पूर्व परंपरेनुसार व्यापारी पिढी सहसा नोकरीत जात नसते. पण, ते व्यापारातही सक्रिय राहिले. व्यापार ते घर हीच त्यांची दिनचर्या होती. व्यवसायाचे बाळकडू त्यांना उपजतच लाभल्याने, त्यांनी त्यात नवनवीन कौशल्यांची भर घालून व्यापारावर पकड निर्माण केली. पाथर्डी शहरात मालपाणी उद्योग समूहाने गायछाप जर्दाचा उद्योग सुरू केल्यानंतर ते व्यवस्थापक म्हणून तेथे रुजू झाले होते. व्यवस्थापनाची जबाबदारी त्यांनी उत्कृष्टपणे हाताळली. कारखाना व बद्रिशेठ पलोड हे उत्तम समीकरण होते. कमालीची शिस्तप्रियता हे त्यांचे ठळक वैशिष्ट्य असल्याने हा कारखाना लवकरच भरभराटीला आला. मालपाणी कुटुंबात त्यांची आत्या असल्याने कारखाना घरचाच असला तरी ते मात्र इतर सहकाऱ्यांप्रमाणेच वावरत असत. त्यामुळे ते सर्वांचे आदर्श बनले. अडीअडचणींत असलेल्यांना त्यांचे नेहमी सहकार्य असायचे. कामगारांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना प्रोत्साहित करत ते त्यांच्याकडून उस्फुर्तपणे काम करवून घेत असत. त्यांच्या या गुणसमुच्चयामुळे अनेक गोरगरीबांना रोजगार उपलब्ध झाला. त्यांच्या निधनाने एक उत्तम समालोचक व व्यवस्थापक हरपल्याने, शहरातील सर्व स्तरांतून त्यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली.



# नवीन वर्षाची नवीन सुरुवात; खेतमाळीस यांनी स्वीकारला पदभार

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा नगरपरिषदेचा निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर झाल्यानंतर दहा दिवसांनी, भाजपच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस व १३ नगरसेवकांनी नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी पदभार स्वीकारत नव्या कार्यकाळाची सुरुवात केली.

हा पदग्रहण सोहळा हभप भुषण महाराज महापुरुष, हभप ज्ञानेश्वर महाराज रासकर व हभप माऊली महाराज म्हस्के यांच्या आशीर्वादाने तसेच आदरणीय लोकनेते माजी मंत्री बबनराव पाचपुते, आमदार विक्रम बबनराव पाचपुते (श्रीगोंदा व नगर विधानसभा मतदारसंघ) आणि डॉ. प्रतिभाताई बबनराव पाचपुते (अध्यक्षा, परिक्रमा संकुल, काष्टी) यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी शहरातील नागरिक, तालुक्यातील ग्रामस्थ, पदाधिकारी व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पदभार स्वीकारल्यानंतर बोलताना नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस म्हणाल्या की, नगराध्यक्षपद ही केवळ राजकीय खुर्ची नसून लोकशाहीची जबाबदारी आहे. सर्व नगरसेवकांना विश्वासात घेऊन, आमदार विक्रम पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीगोंदा शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी आमदार विक्रम पाचपुते म्हणाले की, नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस यांच्यावर शहराच्या विकासाची मोठी जबाबदारी असून त्या भाजपच्या गटनेतेपदाची धुराही सांभाळत आहेत. सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन शहराच्या विकासासाठी काम करावे लागेल. विकासकामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे आश्वासनही त्यांनी दिले. या कार्यक्रमास भाजपचे सर्व नगरसेवक, पराभूत उमेदवार, पक्षाचे पदाधिकारी, शहरातील नागरिक तसेच तालुक्यातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहराध्यक्ष धनंजय कोथिंबीरे यांनी केले, तर नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस यांनी उपस्थितांचे आभार मानले.